**मुळा एज्युकेशन सोसायटी**

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई

## विद्यार्थिनी मंच

**आयोजित व्याख्यान**

## लैंगिक समानता व संवेदनशीलता

**दिनांक-** १जानेवारी २०१८

**वेळ -** सकाळी १०.४० वा.

**स्थान -** सेमिनार हॉल

महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी मंच या उपक्रमांतर्गत सर्व शाखांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनी साठी लैंगिक समानता व संवेदनशीलता या विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याता म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या प्राध्यापिका श्रीमती निर्मला जाधव याची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष पदी महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ.शंकर लावरे होते. तसेच महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रभारी डॉ. ज्ञानदेव झिने आणि या वर्षा चे शैक्षणिक अध्यक्ष व भूगोल विभागाचे प्राध्यापक श्री. शौकत फकीर याची या प्रसंगी विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमांचे प्रास्ताविक करताना डॉ.श्वेता चौधारे यांनी नमुद केले की आज स्त्री-पुरुष समानता फक्त कागदांवरच वा भाषणांतच राहीली आहे, प्रत्यक्षात मात्र नाही. या साठी समाजात प्रबोधनाची गरज असून सर्वप्रथम त्याची सुरुवात विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत बदल घडून करता येणे शक्य आहे. प्रा.निर्मला जाधव यांनी सर्वप्रथम लिंग व लिंगभाव या संकल्पना स्पष्ट करत सामाजीकरणाच्या प्रक्रियेत येणारे लिंगभाव फरक अनेक उदाहरणातुन मांडले. लैंगिक समानतेसाठी ची अडसर ठरणाऱ्या सामाजिक व्यवस्थेच्या ठरवलेल्या कार्यप्रणाली व पितृसत्तात्मक व्यवस्थेवर त्यांनी ताशेरे ओढले. डॉ. ज्ञानदेव झिने यांनी अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोणातुन या विषयाची मीमांसा केली. कार्यक्रमांचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. लावरे याच्या मते मनुष्य अभिव्यक्तितील संस्कार जे विनापरिक्षण स्वीकारले जातात,लैंगिक समानतेस अधिक जवाबदार असतात. वंशवादाच्या अहंकारामुळे पुरुषसत्तेचे उदात्तीकरण झाले, ज्यांत अनेक धार्मिक बाबी अडथळ्याच्या रुपात उभ्या करुन लैंगिक संवेदनशीलते पासुन समाजाला दूर करण्याचे हेतुपुरस्कर काम झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रम च्या शेवटी प्रा. शौकत फकीर यानी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे वृत्तांत लेखन कु.राणी बुळे हीने केले. तर सूत्रसंचालन कु. धनश्री तारडे हीने केले. या कार्यक्रमांस महाविद्यालयांचे प्राध्यापक डॉ. निवृत्ती मिसाळ, श्री. शिवाजीराव ढोंकणे, श्री.अमोल दहातोंडे, श्री. धनेश माने, श्रीमती मीना लांडे, श्रीमती वंदना तोडमल, श्रीमती मनिषा झिने, श्रीमती होन, श्रीमती लोहकरे या ची उपस्थिती होती.

# काही क्षणचित्रे














लैंगिक समानता व संवेदनशीलता


